# सन्तदुहिता

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २९८०



REFBK-0020046
REFBK-0020046

सन्त भोजराज

# संत दुहिता

## कविता संग्रह

REFBK-0020046

REFBK-0020046

संत भोजराज

प्रथमावृत्ती १९७२

किंमत दोन रुपये

प्रकाशिका :

सौ. विमल भागवत राणे

" अशोक प्रकाशन "

सावदा, जि. जळगांव.

*

मुखपृष्ठ चित्रकार :

न. व. सपकाळे

जी. डी. आर्ट ए एम.

अनुवाद, नृत्यीकरण, ध्वनीमुद्रण, नभोवाणी
वितरण आदि हक्क कवि स्वाधीन

*

मुद्रक :

श्री रामदास छापखाना

सु. वि. परदेशी

फैजपूर, जि जळगांव

**निवेदन :**

संत भोजराज ह्यांचा ता. १८-२-१९१७ रोजी जन्म झाला सावदे येथे कवि संमेलन भरवून छप्पन्नावा वाढदिवस साजरा झाला संत भोजराज ह्यांचे साहित्य तपश्चर्येला पंचेचाळीस वर्षे होत आहेत. संत भोजराज साहित्य सम्राट आहेत. त्यांनी एकूण पंचेचाळीस पुस्तके लिहीली आहेत. आपुले ह्यातीत आपुली पुस्तके संतांचे हातात पडावी हाच उच्च हेतू आहे. संत म्हणून कांही सरकारी नौकरांतील दुष्ट शिष्ट लोक पुस्तक विक्री करतांना त्यांचा पाणउतारा करितात त्यांना आपुले अगाध ज्ञान दाखवितांना धन्य म्हणवितात. संत भोजराज तत्त्ववेते, द्रष्टे, ज्ञानी, पंडीत आहेत. कादंबरी, कथा, निबंध, नाटक, टीकाकार आहेत. मुद्दाम कानाडोळा करितात. फौजदार आणि बुकसेलर तोंडावरच निंदा कुचेष्टा करितात. शाळा खात्यांतील कांही शिक्षक असे कां वागतात. संत भोजराज जाणतात त्यांचा स्वार्थ हेतू त्यांना तसे करावयाला सांगतो.

संत भोजराज जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती पैकीच आहेत. जग बघून अनुभव अनुभुतीने ते लिहितात. अधर्मी मनुष्य निधर्मी बनावा! निधर्मी मनुष्य धर्मी म्हणजे संत बनावा हाच उच्च हेतू आहे.

भारत देश निधर्मी राज्य आहे. म्हणजेच जीवंतपणी संताला येथे मान मिळणार नाही. संत भोजराज त्यामुळेच सरकारशी डोके लावित नसतात. त्यांचेवर झालेला अन्याय ते सहन करितात.

ज्यांची कष्टावर श्रद्धा आहे त्याला श्रमिक म्हणतात. श्रमिक जेव्हां उत्पादन वाढवितात ते कलाकार कलावान ठरतात. श्रमिक जेव्हां देव भजतो तो संत समजावा. संत परंपरा ही सात्त्वीक मनोवृत्तीपासून

जोपासली जाते. राजपरंपरा राजस तामस वृत्तीचा प्रचार करते. संत परमेश्वराला शरण जातात. राजकारणी श्रेष्ठींना देव मानतात. पुढारी उच्च वर्णीय, उच्चभू लोक संतांना भीक घालीत नसतात. संत शेटजीकडे पदर पसरवित नसतात.

आज तिनशे वर्षात तुकारामानंतर भारतांत संत कशांला म्हणतात. संत परपरा गाडूनच टाकली. भटजींनीच सात्वीक, राजस, तामस वृत्तीचे लिखाण भाषणातून संत परंपरा दाखविली. त्यामुळे भारतातील वाचनालयात संताचा प्रवेश झाला नाही. शेटजीं सरकार भटजीलाच मान्यता देत असल्याने देशभक्ती हरीभक्ती म्हणजे काय असंत अभक्त लोकांचाच सुळसुळाट झाला. श्रमिक हा अंध अंधारी बैसले असा गुलाम ठरला. शत्रु मित्र कोण गरिबाला गरिब दुष्मन समजू लागला. साधू संत येती घरा प्रत्येक जण पुढाऱ्यालाच संत समजू लागला. संत भोजराजांनी पोलीस खात्यांत चौतीस वर्षे नौकरी केली. त्यांचे लक्षांत शिष्ट दुष्टांचा कावा आल्यामुळेच त्यांनी पहिली घोषणा केली. "श्रमिकांचे साहित्य श्रमिक लिहीतील. गरिबांची गरिबी संत हटवतील. भारत देशांत जेथ पावेतो निधर्मी अधर्मी लोकांचे हातांत सत्ता संपत्ती आहे. तेथ पावेतो शेटजी भटजीचे नादाला लागू नका कष्टावर श्रद्धा ठेवा. देवाला विसरू नका. गरिबाने गरिबाला ओळखावे. संताने संतालाच भजावे. असंत अभक्तांना दुरुन हात जोडावे. शिष्ट दुष्टांशी संबंध नाते तोडावे.

संत भोजराजांची पुस्तके विकत घेतल्याशिवाय वाचल्याशिवाय संतपरंपरा कळणार नाही.

**अशोक प्रकाशन**
सावदा जिल्हा जळगांव

## : अर्पण पत्रिका :

संत हे सात्त्विक मनोवृत्तीतून जन्माला येतात. ते धर्माप्रमाणें वागतात राजकारण टाळतात. ज्ञानी, पंडीत, तत्त्ववेत्ते, द्रष्टे, साधू स्वामी, कर्मयोगी संतच ठरतात. संत प्रसिद्धी पराङ्गमुख असतात. सरकारचे काय चुकते ते धार्मिक, राजकीय, सामाजिक विषयातून मार्मिकपणें दाखवितात. श्रमिक संत गरिबीचेच जीवन पसंत करितात. निधर्मी अधर्मी लोक संताना ओळखतात. मुद्दाम काना डोळा करितात. संत शेटजी भटजीवर टीका करितात. संताना शत्रू मित्र कोणी नसतो. ते भले मनुष्य ठरत असल्याने सर्व सामान्य लोक त्यांना ओळखू शकत नाहीत. संत मात्र संताला ताबडतोब ओळखतात. संत भोजराज श्रमिक सामान्य लोकांत्रे जागृतिकरिता लिहीतात. भारतात पंचावन्न कोटी संत राहतात. हेच जगाला दाखवू ईच्छीतात. संत भोजराज आपली दहावी कलाकृति " संत दुहिता " कविता संग्रह भारताचे पंचावन्न कोटी संत चरणी अर्पण करितांना विठोबाचाच जयजयकार करित आहेत.

संतदास

संत भोजराज

# अनुक्रमणिका-


१ अमृत आस
२ मैं कवि ना बन जाय
३ संत बोलबाला
४ संत राज्याचाच प्रचार
५ खावी बंदुकीची गोळी
६ संतांचे पाय धरी
७ भारताची संस्कृती
८ आमुचे जवळ
९ देवा धातुतील तुझे रुप
१० रुप पहाता लोचनी
११ घुमती अंतरमनी
१२ दूर पळाले दैन्य
१३ भारती संतांना
१४ कशाला हवा हेवा
१५ मी पाहिल्या जगी
१६ पाहला प्रकाश नवा
१७ चोराबरील मोर
१८ व्याही व्याही येती एकत्र
१९ साधु संतांची वाणी
२० बारा कोसात फरक भाषेत
२१ ओळखा तक्षक नागा
२२ संतराज्य प्रचार करा
२३ जीव शीवाला भेटला
२४ भगवंताचेच गीत गाते
२ प्रेमे जोडीता कर
२६ हिवाळा नंतर उन्हाळा
२७ मायबाप पुकारावे
२८ संतराज्य म्हटले आहे
२९ आम्हाला नको काम
३० पहिला बाजीराव
३१ भटजींना आम्ही वंदावे
३२ आम्ही महाराष्ट्राचे प्रकाशक
३३ मराठी असे आमुची मायबोली
३४ जय जय पांडुरंग हरी
३५ ओम् नमो नारायणा
३६ घर जावई शोध
३७ उत्तम मध्यम अधम मार्ग
३८ ब्राह्मण झाला भ्रष्ट
३९ हरी आला रे आला
४० शोक समारंभ होता
४१ भटजी पुराणातील बाप
४२ भज बा! देवा एका
४३ संतांचा होईल रगडा
४४ रात्रंदिन आम्हा हवा
४५ पाया पडतात
४६ उगवला मंगलदिन
४७ शिष्ठांची फुशारकी
४८ सतांचे वैरी
४९ ब्राह्मण जातीत जन्मला
५० ज्ञान म्हणजे काय ?
५१ विठोबा बंदिस्त केला
५२ त्रिवेणी संगम
५३ आम्ही शस्त्राचे व्यापारी
५४ सत्संगती
५५ निघाला विठोबा सार
५६ करायला गेलो गणपती
५७ देवा शपथेवर सांगतो
५८ देवा जेथे जावे तेथें
५९ देवा तुजवरच ठेविती नजर
६० देव देवच करावे

२००८६

# १. अमृत आस

रात्रंदिन मी भारती फिरतो निराधार ॥
देवा तुझाच मला मिळतो आधार ॥१॥

नको ! नको ! हा संसार शिरावरील भार ॥
देवा ! तूंच संत मांयबाप कर ! म्हणतो संसार ॥२॥

जगी कोण सखा ! कोण परका ! कोण करितो भले ॥
देवा ! तुझीच गीता खाता पिता ! गीतेनेच केले भले ॥३॥

सुख दुःखाचा झटका व्यवहारांत दगा फटका ॥
तुझेच चिंतनांत संसार झाला नीट नेटका ॥४॥

संत भोजराजांना एकच आस तुझाच भास ॥
श्रींरंग प्रभूचा निजध्यास हीच अमृत आस ॥५॥

राजा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २००८६ वि: काव्य
दिनांक २१/८/० नोंद क्र. 23199

# २. मैं कवि ना बन जाय !

हे भगवन् तेरा मेरा प्यार कभि मै कवि ना बनजाय ॥
मुझे न होना ! मान, पान, गान तेरी कृपा तेरे सहाय्य ॥१॥

मै हूं अनपढ, कास्तकार, महान रसिक श्रोता ॥
दिनरात सुबह शाम मेहनत कभि ना मै रोता सोता ॥२॥

शब्द खेलना, खिलौना रंजना न आती दरबारी कविता ॥
राम नामकी नशा धून बेहोषीमे है गाता बजाता ॥३॥

मै हूं श्रमिक संत, मुझे न हैं अंत दुनिया है निराली ॥
बनजाता है भंवर, फुलोका रसचर सहेदसे आती लाली ॥४॥

संत भोजराज कहते संत कविता जाती भगवानके पास ॥
चाहे असंत सरकारको पसंत प्रेम भक्तीमे होते है नापास ॥५॥

# ३. संत बोलबाला !

मेरी कविता है अनोखी पुरानी हजारो सालकी ॥
दुनिया समजती है जवान कहते सोलह बरसकी ॥
मै हूं दिदावर कवि सम्राट महाराष्ट्र, भारतका ॥
ठहरा मुशाफीर ना धोबीघाट ना ! घरका ॥१॥

मेरी कविता है सुंदर लाखोके आखोकी रोषनाई ॥
मै बना फरिस्ता ! न रहा रिस्ता ! जींदगी खुदाकी खुदाई ॥
मेरी कविता गाते नाचते जाती भगवानके मंदीर ॥
न मीला मुझे आधार हूं निराधार मेरे साथ मेरा तकदीर ॥२॥

मेरी नर्गिस मेरी जान दुनियामे हुअि पैचान ॥
मधूर संगीत, गीतोंका गान वाहव्वाऽ यहि मीला दान ॥
ना कोई मुझे समझे ! ना पुकारे ! कविका शुभनाम ॥
अहारे कविराज तेरी किस्मत संत गाते गुणगान ॥३॥

संत भोजराज पर है भगवानकी कृपा छाया ॥
प्रतिभा जब घुसगई घर बनगई गुडिया माया ॥
संतोकी कविता घरघरमे नया प्रकाश उजाला ॥
मरनेके बात असंत करते है संत बोलबाला ॥४॥

# ४. संत राज्याचाच प्रचार

भारती असंतांचाच घालतो साहित्य प्रचार ॥
त्यामुळेंच जनतेंत ना सुविचार ॥१॥

कुणाचे ऐकावे ! ऐकू नये ! राजस तामस भाव ॥
बळी तो कान पिळी ! हाच पडतो प्रभाव ॥२॥

भटजींचेंच लिखाणाला रहातो बाजार भाव ॥
सरकारची ज्यांचेवर कृपा तेंच करिती कावकाव ॥३॥

सरकारचें काय चूकते संतांचा प्रमुख टीका भाग ॥
जनजागृति हाच हेतू राजकारणांत नसतोच भाग ॥४॥

संत भोजराजांनी लावीला शोध लेखकाचे दोन प्रकार ॥
संत साहित्याने ठरतो संत राज्याचाच प्रचार ॥५॥



# ५. खावी बंदुकीची गोळी

प्रत्येकाला हवी स्वतंत्रता म्हणजे चैन ख्याली खुशाली ॥
काम नको ! धंदा नको ! भारती जरी कुणी म्हटले मवाली ॥१॥

श्रमिकांनी राबराबावे, कष्ट करावे, रक्त जाळावे ॥
दिड शहाण्यांच्या दुटप्पी भाषणाने चक्रात पडावे ॥२॥

प्रत्येक शिष्टाला वाटते कलेक्टर, डि. एस्. पी. बनावे ॥
सत्ता संपत्तीचा पाया कळस गरिबांना उपदेश करावे ॥३॥

राजकारणात घेता भाग पुढारी हेच मिनिष्टर ठरावें ॥
दुनिया झुकविण्यासाठी गरिबी हटवा ! ढोल बडवावें ॥४॥

संत भोजराज वदति स्वातंत्र्य ठरते सुळावरील पोळी ॥
स्वातंत्र्य रक्षणासाठी करावा त्याग खावी बंदुकीची गोळी ॥५॥

# ६. संतांचे पाय धरी

आम्ही महानुभाव आमुचा पंथ वरचढ आहे जी ॥

आहे जी ॥१॥

स्वामिनारायण पंथ भारती छान शोभे जी ॥

शोभे जी ॥२॥

आमुचा नाथ पंथ भारतात पुरुन उरला जी ॥

उरला जी ॥३॥

आम्ही वारकरी करितो वार पाखंडीवरी ॥

पाखंडीवरी ॥४॥

आमुचे कॉंग्रेस पक्षाचे राज्य आहे भारतावरी ॥

भारतावरी ॥५॥

आम्ही साम्यवादी भाई श्रमिक राज्य मानकरी ॥

मानकरी ॥६॥

समाजवादी साथी गाती आम्हीच कारभारी ॥

कारभारी ॥७॥

धर्मी जातीयवादी करु आबादी संघटणा भारी ॥

संघटणा भारी ।८॥

संत भोजराजांचा ईशारा भारती शेटजी राज्य जोवरी ॥

जोवरी ॥९॥

जनजागृतिसाठी श्रमिक संतांचेच पायधरी ॥

पाय धरी ॥१०॥

# ७. भारताची संस्कृती

भारताची संस्कृती उच्च होती उंच होती शंकाच नाही ॥
भारतात श्रीमंत, शेटजी भटजींच होते ईतिहास पाही ॥१॥

भारती राजसत्ता, राजप्रजा, प्रजासत्ता होती आता आहे.
श्रेष्टींनी बनवावे गरिबांनी मान डोलवावे लोकशाही आहे ॥२॥

भारतांत लिखाण भाषण स्वातंत्र्य होते आता पण आहे ॥
संता करितां पळवाट भटजी करिता सोन्याचे ताट आहे ॥३॥

भारतांत पूर्वापार देव, धर्म, निधर्म अधर्म नांदत आहे ॥
निधर्म अधर्म बघायचें झाले तर भटजी लिखाण सार आहे ॥४॥

संत भोजराज वदति भारत, नाऱ्या नुऱ्या पिऱ्याचा आहे ॥
शेटजी राज्य म्हणजे हवा, उन, पाऊस, आकाश सत्यानाश आहे ॥५॥



# ८. आमुचे जवळ

आमुचे जवळ आहे गुरुकिल्ली ॥
पुढारी बनतां ठरते अजब वल्ली ॥
देशभक्ती सोबत मीळतो मान पान ॥
हरिभक्त आपोपाप खाली घालती मान ॥१॥

नकोच पैसा अडका ! नको काम धाम ॥
मेंढरांचे कळपांत मीळतो राम राम ॥
बोटावरील थुंकी हा योग जमता छान ॥
सरकार दरबारात पत मिळते मानाचे पान ॥२॥

सफेद काळे गुंड, अज्ञजन देतात मान ॥
अश्वासनांचे भांडवल जीवनी सन्मान ॥
संतापेक्षां असंतांचे रम्यच भजन पूजन ॥
कुबुद्धीची गुरुकिल्ली लाविता खुलते शान ॥ ३ ॥

स्वातंत्र्याची अजब व्याख्या म्हणजे पुढारी ॥
आळशी दुटप्पी चतूर बनती कारभारी ॥
देश धर्माचे नांवाखाली रुढी सर्व तोपरी ॥
सती पेक्षां चमकते जीवन स्वार्थी व्यभिचारी ॥ ४ ॥

संत भोजराज वदति धर्म राजकारण फरक ओळखा ॥
आपण काय बनायच ? बना पारखी ! सोने पारखा ॥
संतांची कसोटी चारित्र्याचे रहाते भट्टीत ॥
पुढाऱ्यांची सचोटी राजकारणाचे गट्टीत ॥ ५ ॥

# १. देवा धातुतील तुझे रुप

देवा ! धातुतील तुझे रुप खूप सुंदर दिसते ॥
भक्त अभक्तातील फरक तुला कर्तव्यच नसते ॥ १ ॥

देवा तुळशी आंब्याची छाया तूं सुगंध चवदार ठरतो ॥
कोण पाणी घालीतो, खांडितो स्थितप्रज्ञ साधू बनतो ॥ २ ॥

देवा ! पशू पक्षांतील तुझी रम्य मूर्ती दूधमांस पूरवते ॥
चारापाणी घालतांना कोण कापीतो हंबरायचे नसते ॥ ३ ॥

देवा ! तुझा मानवाचा मोहक अवतार तुला नकोसा होतो ॥
संता ऐवजी असंत नापसंताशी गांढ जीव नकोसा होतो ॥ ४ ॥

संत भोजराजांनी प्रेम भक्तीने देव हृदअि बैसविला ॥
शुद्ध चारित्र्य रुपरंगाचा देह आत्मा देवच बनला ॥ ५ ॥

# १०. रुप पहाता लोचनी

रुप पहाता लोचनी ॥
विठ्ठलच भरला मनी ॥
सुख लाभले जीवनी ॥
भटकावे ! कां ! रानीवनी ॥ १ ॥

विठ्ठल भजतां लोपला अंधार ॥
हाती आले ज्ञानाचे भांडार ॥
हरिनामात सुख अपरंपार ॥
संसार नय्या गेली गंगापार ॥ २ ॥

विठ्ठल नामाची होता आवडी ॥
भरती अमृताने दोन्ही कावडी ॥
शिष्ट दुष्टांची संगत नावडी ॥
सत्संगाची लागते गोडी ॥ ३ ॥

हरिनामाने येतो उत्साहाला पूर ॥
भीतीने धडकत नसते उर ॥
देवच करितो संकट दुःख दूर ॥
हरिभजनांत होता चूर ॥ ४ ॥

संत भोजराजांना घडले प्रभू दर्शन ॥
देवाचे रात्रंदिन करितां भजन ॥
संत असंत फरक हेच ज्ञान ॥
देह आत्मा ज्ञानाने पळाले अज्ञान ॥ ५ ॥

# ११. घुमतो अंतरमनी

वसंत बहरता खुलता रानी वनी ॥
कोकीळा करी कुहुकुहूंऽ आमुचे अंगणी ॥ १ ॥

नयनरम्य बगीचा फुलता थंडगार झुळुक ॥
कोकीळेचे सुरु होता गान आनंद होतो अचूक ॥ २ ॥

खायला प्यायला सरबत, मठ्ठा आंब्याचा रस ॥
लग्नसराई घाईच घाई पिकते हास्य खसखस ॥ ३ ॥

ऋतूंत ऋतूं तरुण तरुणींना असतो वसंत पसंत ॥
चैन भोग मिलन गान नसतोंच आराम उसंत ॥ ४ ॥

संत भोजराजांचा वसंत फुलता देह बनी ॥
भक्त कोकीळेचा सरगम घुमतो अंतर मनी ॥ ५ ॥

# १२, दूर पळाले दैन्य

देवा ! मला नसते चिंता ॥
तूं जवळच असता अनंता ॥ १ ॥

मी करित नसतोच काळजी ॥
तुझीच करिता हाजी हाजी ॥ २ ॥

मी सोडले सारे व्यवहार ज्ञान ॥
तव सहवासाने पळाले अज्ञान ॥ ३ ॥

मला नको कुणाचे शिष्यत्व उपदेश ॥
पठण करिता तव शुभ संदेश ॥ ४ ॥

संत भोजराज जगी झाले धन्य ॥
मदत करिता संत सैन्य दूर पळाले दैन्य ॥५॥



# १३. भारती संतांना

भारती संतांना नसतो मान पान ॥
जे घेतात हुंडा हुंडा त्यांचाच मान सन्मान ॥ १ ॥

भारती संतांना नसतो मान पान ॥
पुढाऱ्यांचा होतो पेंढारी तोच घेतो मान ॥ २ ॥

भारती संतांना नसतो मान पान ॥
सर्वत्र असंत अभक्तांचीच वरतान ॥ ३ ॥

भारती संतांना नसतो मान पान ॥
व्यभिचारीच मांडतात बाजू छान ॥ ४ ॥

संत भोजराजापेक्षां भारती असंत चमकले ॥
संतांनी घेतां कसोटी पितळ उघडे पडले ॥ ५ ॥



# १४. कशाला हवा हेवा

मला अलिकडे स्वतःचा विसर पडतो ॥
समोरचा कोण ? प्रश्नच सुटत नसतो ॥ १ ॥

मी देशभक्त हरीभक्त मोह आवरत नसतो ॥
मी वेडा, दळभद्रा, छंदी शिष्ट दोष लावितो ॥ २ ॥

कोण काय बोलतो मी लक्षच देत नसतो ॥
माझी कविता बनता देवता मी पत्नीला विसरतो ॥ ३ ॥

भारती असंत अभक्त संघटना सत्ता मोठी ॥
तरीच संतांची पाहिली जाते त्याग कसोटी ॥ ४ ॥

संत भोजराजाचा ईशारा देवावरच भरवसा ठेवा ॥
संत आहेत पाठीशी असंतांचा कशाला हवा हेवा ॥ ५ ॥

# १५. मी पाहिल्या जगी

मी पाहिल्या जगी मूर्खपणाच्या रीती ॥
अहिंसा परमोधर्म वदति ते सत्ता संपत्ती बाळगती ॥ १ ॥

मी पाहिल्या जगी मूर्खपणाच्या रीती ॥
चोरी करणें पाप जे बोलती ते चोरीचा माल घेती ॥ २ ॥

मी पाहिल्या जगी मूर्खपणाच्या रीती ॥
स्वतः पंडीत जे म्हणविती ते संतांची निंदाच करिती ॥ ३ ॥

मी पाहिल्या जगी मूर्खपणाच्या रीती ॥
जे त्यागाच्या गोष्टी करिती ते भोगी जीवन जगती ॥ ४ ॥

मी पाहिल्या जगी मूर्खपणाच्या रीती ॥
पघवीधर उच्च समजती ते हंडा हुंडा घेती ॥ ५ ॥

मी पाहिल्या जगी मूर्खपणाच्या रीती ॥
धर्माबद्दल जे ठाम बोलती ते राजकारणच खेळती ॥ ६ ॥

संत भोजराज वदति शिष्ट दुष्टांना रावणाची गती ॥
टाळा निधर्मी, अधर्मी ! मिळवा संत संग सत्संगती ॥ ७ ॥

# १६. पाडला प्रकाश नया

काळे नंतर पांढरे ढग वरती निळे आकाश ॥
देवा ! मी अंतरयामी पाहिली तुझी पाऊले सावकाश ॥ १ ॥

उन, वारा, थंडी झोंबला शेवटी थंडगार पाऊस ॥
देवा ! गाजर, राताळी नंतर चाखला राम उस रस ॥ २ ॥

गरिबी माध्यम स्थिती लाभली मला श्रीमंती ॥
देवा ! नको नको संपत्ती तूंच तरणोपाय अंती ॥ ३ ॥

बनलो कोल्हा, लांडगा शेवटी क्रुर वाघ ॥
माणुसकी हाच धर्म समता शांतीच जीवन भाग ॥ ४ ॥

संत भोजराजांची किमया बघीतली तीच वर्णीलीदुनिया ॥
श्रमिक संत, संत राज्यासाठी पाडला प्रकाश नया ॥ ५ ॥



# १७. चोरावरील मोर

भारती संत, राजपरंपरा दोन भेद दोन प्रकार ॥
संत जनहो ! संत बना ! करा मनाशी विचार ॥ १ ॥

राजस म्हणजे संतांची निंदा कुचेष्ठा करणें ॥
गरिबी हटविण्यासाठी श्रीमंत पंत बनणें ॥ २ ॥

संत बनणें म्हणजे जगाचे कल्याण करणें ॥
रात्रंदिवस जनसेवा आपुला देह झिजविणें ॥ ३ ॥

राज परंपरा म्हणजे शुद्ध अधम छान राजकारण ॥
तामस भोजन करितांना संतांचे ओढवते मरण ॥ ४ ॥

संत भोजराज भारती करिती संत राज्य प्रचार ॥
शेटजी भटजी आहेत भारती चोरांवरील भोर ॥ ५ ॥



# १८. व्याही व्याही येती एकत्र

व्याही व्याही येती एकत्र बघुनी पात्र हाताळती व्यवहार ॥
मुलीचा बाप रहातो लाचार सूचत नसतो आचार विचार ॥ १ ॥

होतो लालगंध सर्वच अंध बातमी खूप देवाण घेवाण ॥
रहातो हंडा, हुंडा, बस्ता, आंदण, रोख पैसा वरताण ॥ २ ॥

शंभर ऐवजी तीनशे येतात वऱ्हाडी जणूं लुटारु मारेकरी ॥
जो तो दिमाख दाखवी वदे " प्रथम माझी वरवर करी " ॥ ३ ॥

तांडव नृत्य, नंगानाच, मांडवांत होता सुरु वाद्य आकांत ॥
संत सज्जन विनवीती देवा! गरिबाचा किती पहाशी अंत ॥ ४ ॥

संत भोजराज वदति नच कुणी विचारी पधवीधर अविचारी ॥
सुधारक म्हणती जातीत करा सुधारणा घर सोन्याने भरल्यावरी ॥५॥



# १९. साधू संतांची वाणी

साधु संतांची वाणी ऐका हो ! संत गाणी ॥
सोन्याची सात्वीक नाणी चालते स्वर्ग नभोवाणी ॥१॥

कंस रावण भक्तांना वाणीने भारती येतो थंडी ताप ॥
संताचा नाश करणे ह्याच दिनरात दुःख संताप ॥ २ ॥

भारती लाभले यश अभक्तांनी केले संत अहित ॥
श्रमिक सामान्यांत पाडली फूट वदति हेच रहाते हीत ॥ ३ ॥

श्रमिकांनी शेटजींना भजावें हीच पाडली रीत ॥
भाषण लिखाण केले बंद संत जगती मूग गीळीत ॥ ४ ॥

संत भोजराजांनी दिला धीर श्रमिक संत जना ॥
शुभ संदेश भारता पुढाऱ्यांना म्हणू नका काका नाना ॥ ५ ॥

# २०. बारा कोसात फरक भाषेत

बारा कोसात, फरक भाषेंत दिसून येते नवलाई ॥
संताची भाषा एकच भारती शिकवीते सत्याई ॥ १ ॥

भाषा भेद, प्रांत भेद, विषमता, भेदा भेद भटजी पुण्याई ॥
भेदा भेद नाहीसा करणें चालते संतांची हातघाई ॥ २ ॥

श्रम नको श्रमिक नको भूरळ थापेबाजी हाच प्रचार ॥
जगाचे कल्याणा साठीच देह झीजवा! संतांचा सुविचार ॥ ३ ॥

दगडामध्यें राम असतो भटजी पुराणातून बोलतो ॥
रामनामाने मनुष्य तरतो संतांचा बोल अनमोल ठरतो ॥ ४ ॥

संत भोजराज वदति भारताला भटजींची लागली डोकेदुखी ॥
शेटजीचे राज्य समजा श्रमिकांची ठरते पोटदुःखी ॥ ५ ॥

# २१. ओळखा तक्षक नागा !

साहेबाचा पोऱ्या मोठा अकली ॥
बिन बैलांनी गाडी कशी धकली ॥ १ ॥

भटजीचा पोरगा रहातो नकली ॥
भारती त्याने लाज शरम विकली ॥ २ ॥

सत्य, ज्ञान, साहित्य लपविले असली ॥
शेटजीची वरवर संतांना मागे ढकली ॥ ३ ॥

संत असंत, धर्म निधर्म, पाडला भेद ॥
भटजीचे बोल सरकारने ठरविले वेद ॥ ४ ॥

संत भोजराजांचा ईशारा बा संता ! हो जागा ॥
रात्र आहे वैऱ्याची ओळखा तक्षक नागा ॥ ५ ॥

# २२. संतराज्य प्रचार करा !

देवा ! तूंच निर्मीला मानव, जलचर, पशू खग ॥
तुज बद्दल शंका कां ! यावी मानवा मग ॥ १ ॥

शेटजीचे राज्य भटजींचा प्रचार मायावी जग ॥
उत्पादन वाढ गर्वच गर्व तरीच शिष्टांना येते रग ॥ २ ॥

नास्तीक आस्तीक लढाई जिंकले राक्षस मायावी ॥
सत्ता संपत्तीची नशा वदते मानवा आमुचीच राहील बढाई ॥ ३ ॥

भारती असंतांनी संतांना केले ठार तुझी संपली सत्ता देवराया ॥
यामुळेंच निधर्म अधर्म वाढला पुढाऱ्यांना हवी माया ॥ ४ ॥

संत भोजराज वदति देवाला स्मरा संताचे पाय धरा ॥
असंत, अभक्तांना द्या धक्का ! भारती संतराज्य प्रचार करा ॥ ५ ॥

# २३. जीव शीवाला भेटला

देह नाशवंत ठरतो आत्मा अमर ठरतो ॥
कळले तरी मनुष्य अशाश्वताला कवटाळीतो ॥ १ ॥

आत्म्यापेक्षां आरशांत जेव्हां देह सुंदर दिसतो ॥
मानव देहाला पूजतांना गाडी मोटारीतून मिरवितो ॥ २ ॥

सत्ता संपत्तीचें जोरावर मोठा लहानास गुलाम करितो ॥
मालक नौकर हाच शहाणपणा संतांचा आदेश धुडकावितो ॥ ३ ॥

खूप कमवावे मायावी जेव्हां मायेंत गुरफडतो ॥
तेव्हां ! मी मी माझे माझे हेंच प्रदर्शन भरवितो ॥ ४ ॥

सुख दुःखाचे लढाईत अभक्त जेव्हां दुःखच भोगतो ॥
तेव्हां ! माधवा ! केशवा ! पांडुरंगा ! देवाला हाक मारितो ॥५॥

देवाचे येता बोलावणें जेव्हां ! मुलांचा मेळा गोतावळा जमतो ॥
देवा ऐवजी नको ते बघता असंत देवावरच रागवितो ॥ ६ ॥

संत भोजराजांना बालपणी देह आत्मा फरक कळला ॥
क्षेत्रांत पडतांच प्रकाश जीव शिवाला भेटला ॥७॥

# २४. भगवंताचेच गीत गाते

सात्विक राजस तामस गीता गीत भटजी सुरांत गातात ॥
मंत्र्याची कृपा होता गाती गीता गीत राजदरबारांत ॥ १ ॥

राजस पाषाणाचे मंदीर कळस सुंदर तामसाचाच देव ॥
सरकारची शिफारस होता भारत मंदिरी भटजी पुजारीच देव ॥२॥

विद्येची नासक्ती, विषयाची आसक्ती दारुगोळा विद्यालय ॥
अहिनकुलांची हिंसा, घेराव, अहिंसा ! संतांना नसतो वाव ॥ ३ ॥

निधर्माचे खाणी, अधर्माची चाळणी गाळती ज्ञानकण ॥
धर्माचे भट्टीत टाकीता पितळ केरांत जाते सारे मुसळ ॥ ४ ॥

संत भोजराज वदति भटजी गीता राजस तामसकडे झुकते ॥
श्रमिक संतांची गीता भगवंतांचेच गीत गाते ॥ ५ ॥



# २५, प्रेमे जोडीता कर

प्रेमे जोडीता कर मी पाहिले रुप मनोहर ॥
घडता जादू चमत्कार प्रभूचा मीळाळा वर ॥ १ ॥

नित्य नियमीत साधू संत घालीती येरझारा ॥
चुकला जन्म मरण माया चक्राचा फेरा ॥ २ ॥

निंदा, कुचेष्टा संपता जागृति आला स्वाभिमान ॥
सुरु झाले सोनियाचे ताटी अमृताचे पान ॥ ३ ॥

सुख दुःख, आशा निराशा संपली दिसले रामचरण ॥
जीवनाचा सारच बनला देवाचे नामस्मरण ॥ ४ ॥

संत भोजराजांची चूक काढली असंत जनांनी ॥
विठ्ठलाचे घडविले दर्शन संतजन अभंग फुलांनी ॥ ५ ॥



# २६. हिवाळा नंतर उन्हाळा

हिवाळा नंतर उन्हाळा नियमीत सुरु झाला पावसाळा ॥
देवा ! तुझ्या मनगटावरचे घड्याळ देता चॉबी टळतो घोटाळा ॥१॥

धो ! धो ! पडता पाऊस सृष्टी देवता हिरवा शालू नेसते ॥
सुंदर वस्त्र सोन्याचे घालीता दागीने पोटी आनंदे भरते ॥ २ ॥

दिसत नसतो आत्मा मेला तो परमात्मा तू खूनी बोलती ॥
मंत्र्यापेक्षा कनिष्ठ ठरतांच माथ्यावर खापर हंडी फोडती ॥ ३ ॥

देवा ! तूं संतांचे खातोस पितोस आहेस वृद्ध मायबाप ॥
टळतो दुष्काळ, येता सुकाळ नाहीसे होते पाप आपोआप ॥ ४ ॥

संत भोजराज वदति देवा ! तव नामाने पापी उद्धरतात ॥
नास्तीक, असंत, अभक्त, राक्षस किडा मुंगीप्रमाणे मरतात ॥ ५ ॥



अनुक्रम २००४६ वि. काव्य
क्रमांक २७ २९८० नोंद दि. २३/९/९९

## २७. मायबाप पुकारावे

जातियता हीच जात त्यांना उच्च कां ! म्हणावे ॥
निधर्म हाच धर्म समजणारांना धर्मी कां ! बोलावे ॥
सत्ता हीच ज्यांची मत्ता त्यांचे पाय कां ! धरावे ॥
संपत्ती हीच मती ज्यांची जय जयकार कां ! करावे ॥ १ ॥

लिखाणाची मक्तेदारी भाग सात्विक कां ? ठरावे ॥
बोलाचाच कढी भात खाऊन तृप्त झालो कां ! वदावे ॥
श्रमिक संताचा द्वेष करणारे पंडीत कां ! समजावे ॥
प्रेम भक्तीचा अभाव त्यांना उगीच भाव कां ! द्यावे ॥ २ ॥

संत भोजराज वदति श्रमिकांना संत समजावे ॥
उत्पादन वाढविणारानाच पंत संबोधावे ॥
वाटप करणारांना लोक हितवादी म्हणून वंदावे ॥
समता, शांतता, राखणारांना मायबाप पुकारावे । ३ ॥

# २८. संतराज्य म्हटले आहे

मंत्री संत्याला देतो मान लोकशाहीत अशक्य आहे ॥
ब्राम्हणाने नवबुद्धाचे पाया पडावे राजकारण म्हटले आहे ॥ १ ॥

गरिबी हटविण्यासाठी शेटजी श्रीमंत बनणें घटना आहे ॥
आय. अे. एसला स्थितप्रज्ञ म्हणावे शासन परंपरा आहे ॥ २ ॥

भारती बाळूंतून तेल काढणे बिज्ञानाचा भाग आहे ॥
मृगजळाने तहान भागते आध्यात्मीक प्रयोग आंहे ॥ ३ ॥

बाजार बसवीचे ज्ञान सती पदवी समारंभ आहे ॥
धर्मापेक्षां निधर्म श्रेष्ठ जाहिरातबाजीच आहे ॥ ४ ॥

संत भोजराज वदति धर्माचा पुढाऱ्याशी संबंध नव्हे ॥
शिवाजी तुकाराचे पाया पडतो संतराज्य म्हटले आहे ॥ ५ ॥

# २९. आम्हाला नको काम

आम्हाला नको काम थोड्या वेळांत भरपूर हवे दाम ॥
कोल्ह्याचा बनता वाघ मेंढरांनी करावा रामराम ॥ १ ॥

भारती आमुचे मायबाप करित होते कष्ट संसार नेटका ॥
शेटजी भटजींचा आदर्श राहतो कोर्ट कचेरीत दगा फटका ॥ २ ॥

एका तपांत श्रीमंती ध्येय, लॉटरी, मटका दारुचा घोट ॥
चंगी, भंगी, रंगी, ढंगी श्वान पण भरतात पोट ॥ ३ ॥

धर्म नको ! हवी रुढी ! सोन्याची बेडी मारती उंच उडी ॥
सत्तेने लाभता प्रतिष्ठा शिष्टांनाच वदति सवंगडी ॥ ४ ॥

संत भोजराज वदति दुष्टांना असंत संग सत्तेची भट्टी ॥
प्रेम भक्तीचा अभाव मूर्खांनाच भाव शिष्टांची संगत गट्टी ॥ ५ ॥

# ३०. पाहिला बाजीराव

पहिला बाजीराव शूर होता दुसरा वाईट नव्हता ॥
भटजींचाच बाजीराव चांगला ईतिहास ओरडत होता ॥ १ ॥

भारताची संस्कृती चांगली मुळांत वाईट नव्हती ॥
भटजीने बोलावे मुक्यांनी ऐकावे श्रवण भक्तीच होती ॥ २ ॥

बाळ्याचा बाळाजीपंत होताच भटजींनी करावा बोभाटा ॥
जो संसार करितो नेटका वदावा कुंभाराचा लोटा ॥ ३ ॥

अर्ध्या हळकुंडांत आचार्य भटजी कृपा प्राचार्य वदावा देव ॥
चढती उतरती भाजणीं महादेव विसर पाडावा संत हाची देव ॥४॥

संत भोजराज वदति श्रमिक संतांचाच अभ्यास करा ॥
कष्टानेच कळतो धर्म जीवनाचे मर्म भजा रुकमा देवीवरा ॥५॥

# भटजींना आम्ही वंदावे

भटजींना आम्ही वंदावे असे वंदनिय काय आहे ॥
शेटजींना आम्ही निंदावे भांडायला वेळ कुठे आहे ॥ १ ॥

आम्ही संतांचे दासांचे दास प्रेम भक्ति परिक्षा पास ॥
शेटजी भटजींना रहातात सत्ता संपत्तीचे पाश ॥ २ ॥

राज परंपरा, संतपरंपरा एक नाही आम्हां ज्ञानाने कळले ॥
करिता हरिभजन संतांचे वंदिता चरण जीवन सुखी बनले ॥३॥

आमुचे विद्यालयातील सूर्य कधीच मावळत वीझत नसतो ॥
असंतांचा प्रकाश अंधार शिकारी शिकारच करितो ॥४॥

संत भोजराज वदति संत अहिंसेचे असतात भक्त ॥
भारती संतच हरिभक्त देशभक्त नसतात विषयासक्त ॥५॥

# आम्ही महाराष्ट्राचे प्रकाशक

आम्ही महाराष्ट्राचे प्रकाशक साहित्य सम्राट महान संत ॥
स्वार्थी, ढोंगी, पेंढारी पुढाऱ्यांना खेद ना खंत ॥१॥

आम्हीं गाता भजन संत जमतात वाजते मृदुंग टाळ ॥
रावण कंस भक्तांचे चाळे शहरात बांधिती बंगले चाळ ॥२॥

आम्ही वाचे बोलतो गोड प्रेमे करितो किर्तन प्रवचन ॥
असंत वदति आम्हां भटजी तमाशा पसंत नृत्यकीचे नर्तन ॥३॥

संत प्रचार, श्रमिक जागृति साहित्य हेतू एकमेव ॥
सरकार अवकृपा, पुढाऱ्यांचा विरोध, शिष्टांची कावकाव ॥४॥

संत भोजराज वदति संतांचे घर संतांनीच सजवायचे ॥
शिष्ट, दुष्टांशी असहकार रात्रंदिन हरिभजन करावयाचे ॥५॥

# ३३. मराठी असे आमुची मायबोली

मराठी असे आमुची मायबोली हिंदी राहील राजभाषा ॥
शेटजी भटजी वदति संतांनो ! भारतांतून गुंडाळा गाषा ॥१॥

आम्ही श्रमिक संतांनी स्विकारले आव्हान असंतांचे ॥
सत्याग्रह, मुग्धता, असहकाराने पुकारले बंड गोड वाचे ॥२॥

करुं काम, भजूं राम त्याग सेवा प्रेमभक्तीने जिंकू भारत ॥
वाघ, सिंह, अजगर, नागांचें काढू दात अहिंसा आमुचे व्रत ॥३॥

धर्म राजकारण एक नव्हे ! राहील आमुची जाहिरातबाजी ॥
रात्रंदिन जनजागृति बुद्धिने ओळखू कोण आहे पाजी ॥४॥

संत भोजराज वदति श्रमिक संतांनो ! दुष्टांचे ऐकू नका ॥
रावणाचे वंशज मायावी शेटजी भटजी हेंच सांगत होता तुका ॥५



# ३४. जय जय पांडुरंग हरी

जय जय पांडूरंग हरी तूंच करी कृपा संतावरी ॥
करितां प्रेम भक्ती न्याहरी तूंच दिसतो भारती श्रीहरी ॥१॥

तूच संतांचा मायबाप तुझीच छाया गरिबावरी ॥
पळाले दुःख, दैन्य, चिंता धर कृपाछत्र डोक्यावरी ॥२॥

काढिला संसारातील सार तूच आधार गेली नय्या पार ॥
सौख्य, आनंदे भरतां घर आमुचा तूच पालनहार ॥३॥

रात्रंदिवस करितां संसार मायेचा वीट आला रामराया ॥
नको ! नको ! असंतांची संगत शरण आलो देवराया ॥४॥

संत भोजराज झाले निवृत्त, संसार मुक्त शेवटी आत्माराम ॥
हरिभजनच काम धाम ! मंत्र श्रीराम जयराम जयजयराम ॥५॥



# ३५. ओम् नमो नारायणा !

ओम् नमो नारायणा ! वंदितो तव चरणा ॥
संतांची निघाली दिंडी चुकवी जन्म मरणा ॥१॥

देवा ! तूच मायबाप तुजवरच आमुचा भरवसा ॥
तुझ्याच कृपेने मीळते खायला तुझाच सर्वदूर ठसा ॥२॥

आम्ही रात्रंदिन करितो कष्ट तूंच देतो आम्हां फळ ॥
देवच देहातील बनता यंत्र लाभते हत्तीचें बळ ॥३॥

आतां कुणाला नच मागणे कांहीं संतसंग घडावा ॥
जो लाभला तुझाच ठेवा तव चरणी देह पडावा ॥४॥

संत भोजराज वदति साधू संन्याशांना संत म्हणतात ॥
अरी राजसवृत्तीचे पुढारी तामस पेंढाऱ्यांना वदतात ॥५॥

# ३६ घर जांवई शोध

देवा ! पुरांत बुडाले पंढरपूर चंद्रभागेत तरले खेडे बावडा ॥
महाराष्ट्र, भारतांतील असंत धांवले प्याले राजपक्ष बेवडा ॥१॥

तेलाची पथ्य पाळतांना खायचा असतो जात बडा ॥
शेटजी वर्तमानपत्रांत जे चमकतात तो बदावा बडा ॥२॥

निधर्मी राज्यांतील अधर्मीयांचा तमाशा पितात खोपडी ॥
भारताचे कल्याणासाठी खासदार, मंत्री जाळतात संत झोपडी ॥३॥

बावडा म्हणजे पानपतची लढाई ठरला जांबई शोध ॥
विभूति भोंवती भुतांचा नाच संतांनी घ्यावा बोध ॥४॥

संत भोजराज वदति भारती संतांपेक्षां मौलिक वाणी ॥
नान्या नुन्याचे गायनानंतर रावांची ऐकावी सत्याची गाणी ॥५॥

# ३७. उत्तम मध्यम अधम मार्ग

उत्तम मध्यम अधम मार्ग मानव संगतीचे ॥
आपण कोणता धरावा जेवण जेवावे अमृताचे ॥
सात्विकता गावराणी तूप राजस वदावा डालडा ॥
तामस म्हणजे दारु अधोगतीचा रहातो खड्डा ॥ १ ॥

ज्ञानी, जिज्ञासू, हितार्थी विठ्ठल भक्तिमार्ग चार ॥
हाताळावा कोणता मानवा, कर मनाशी विचार ॥
ज्ञानी म्हणजेच सात्विक मार्ग सरळ सोपा संतांचा ॥
हितार्थी, जिज्ञासु, राजस विठ्ठलतो मार्ग तामसाचा ॥ २ ॥

नौशा, हौशा, गौशा यात्रेला निघाले पंढरपुरी ॥
कुत्र्याला मश्रुची झूल गाढ्याबरोबर नळ यात्रा करी ॥
संतांपेक्षां असंतांचे बडवे या ! या ! स्वागत करी ॥
मंत्र्याने फाडली फीत ! पाहुणा विठोबा भक्ताघरी ॥ ३ ॥

संत भोजराज वदति संत मार्गच आहे सोपा सरळ ॥
हमखास हटते गरिबी जाते किल्मीष, पित्त, मळमळ ॥
भेदाभेद नाहीसा होतो संत संग संतमार्गाने ॥
हरिभक्ती सोबत देशभक्ती साधते युक्ति प्रयुक्तिने ॥ ४ ॥

# ३८. ब्राह्मण झाला भ्रष्ट

ब्राह्मण झाला भ्रष्ट तरी भारतात माना श्रेष्ठ ॥
कलेक्टर' मिनीष्टर, ठरता वरिष्ट बाकी वदावे कनिष्ट ॥ १ ॥

सत्ता संपत्ती लाभतांच भटजी शेटजीची वरवर करी ॥
साधु संत कुणास म्हणावे मुद्दाम अपप्रचार करी ॥ २ ॥

संतापेक्षां महानंदा सुंदर चतुर सर्वच करिती वरवर ॥
पुढारी पेंढाऱ्यांचा होता सत्कार असंत जोडीती कर ॥ ३ ॥

संत भोजराज वदति हा महिमा शेटजी राज्याचा ॥
भटजींचा मानभावी उपदेश ! संतासाठी ठरतो धोक्याचा ॥ ४ ॥



# ३९. हरी आला रे आला

हरि आला रे ऽ आला घेऊनि पाणी पावसाळा ॥
अमृत सिंचनाने न्हाता धरणी आनंद संतांना झाला ॥ १ ॥

पाट, बंधारे, पाझर तलाव नच सीमा मंत्री भाषणाला ॥
पळतां पाऊस लांब लांब वदति देवाने घात केला ॥ २ ॥

देवाला दोष देत पुढारी म्हणती आम्ही काय करावे ॥
आम्ही करितो भारताचे भले देव, श्रमिक होती आडवे ॥ ३ ॥

अहि नकूल, संत असंत वाद आहे फार पुरातन ॥
मी ! मी ! माझी कृती म्हणजे वेद असंत प्रचार सनातन ॥ ४ ॥

संत भोजराजांनी यमुनातीरी बघितली रासक्रिडा ॥
तुटता मवाचे बंद प्रसादानंतर खादला गोविंद विडा ॥ ५ ॥



# ४०. शोक समारंभ होता

आम्ही पाहिला अर्थमंत्री शेटजी पत्रांत फोटो होता ॥
करवाढ हाच अनर्थ गरिबांना हटवा प्रयोग होता ॥ १ ॥

हिवाळा, उन्हाळा, पावसाळा ऋतूत बदल झाला होता ॥
किंगकाँग, दारासिंग फ्रिस्टाईल, भाऊ मांगाचा तमाशा होता ॥२॥

सभ्यता, सौजन्यता, शांतता पुतळे बाम्बे कौन्सील हॉल होता ॥
रॉकेलचा फेकता पेटता बोळा हिरोंचा नीरो बांसरी वाजवीत होता॥ ३

बावळ्याचे भट्टीतून बेवडा पिऊन नाऱ्या पिऱ्या झिंगला होता ॥
रावांचा सत्त्याचा शोध पत्त्यांचा बंगला बनला होता ॥ ४ ॥

संत भोजराज वदति अति शहाण्यांचा बैल रिकामा होता ॥
बैल गेला झोपा केला, साप जिवंत बाप मेला शोक समारंभ होता ॥५

# ४१. भटजी पुराणांतील थाप

भटजी पुराणांतील थाप बकासूर ॥
खात होता गाडाभर अन्न संत मानव ॥
भीमदादाने धर्माज्ञे मारिला बकासूर ॥
सुटका केली भक्तांची बनला देव ॥ १ ॥

भारतांतील बकासूराचे वंशज कोठे गेले ॥
पांडवांतील धर्म, भीम, अर्जून नाहीसे झाले ॥
भटजीने कांही लिहावे आम्ही मान्यता द्यावे ॥
आम्ही कांही लिहतां बोलतां नाक मुरडावे ॥ २ ॥

संत परंपरा राजपरंपरा वेगळी कां ! न कळवावे ॥
संतांनी कां ! राजांनाच हात जोडावे ॥
बकासूर म्हणजे शेटजी सत्य तेच वदावे ॥
संतांनी संतराज्य साठी संताचे पाय धरावे ॥ ३ ॥

संत भोजराज वदति उद्योगानंतर वाचन करावे ॥
संताचे साहित्यातून भटजी थाप गाळून टाकावे ॥
भटजी लिखाण बकासूरी जीवन स्मरावे ॥
श्रमिक राज्य प्रचार जागृती भाग मानावे ॥ ४ ॥

# ४४. रात्रंदिन आम्हां हवा !

रात्रंदिन आम्हां हवा एकच जादू चमत्कार ॥
उद्योग न करितां भरले जावे आमुचे घर ॥ १ ॥

आमुचा कष्टापेक्षां पैशावर लोभ भारी ॥
धर्मापेक्षां रुढी प्रिय करितो पंढरीची वारी ॥ २ ॥

मुखमे राम बगलमे सुरी हाच मंत्र जपतो ॥
उठल्या बसल्या मीच हरिभक्त जाहीर करतो ॥ ३ ॥

आप कमाईपेक्षां बाप कमाईवरच रहाते श्रद्धा ॥
पिढ्यांचेपिढ्या श्रीमंती देवावर अश्रद्धा ॥ ४ ॥

संत भोजराज वदति वाघ सिंह राजस तामस ठरतात ॥
गाय, बैल, शेळी, मेंढी जीवन सात्वीक जगतात ॥ ५ ॥



# ४५. पाया पडतात

संत ! संत ! आम्हा हो ऽ आहेत पसंत ॥
किती करु गणती त्यांची भारती अनंत ॥ १ ॥

भारती संतच पोसती असंत नापसंतांना ॥
संताचेच हातचे चालते देवी देव देवतांना ॥ २ ॥

करुणेचे सागर, सौख्याचे आगर, संत मायबाप ॥
असंतांनी केले गारद बनुनी वाघ विषारी नाग । ३ ॥

भारती संतच पेरितात आनंद, सौख्य, शांतता ॥
असंत पुढारी पसरवितात विषवेल अशांतता ॥ ४ ॥

संत भोजराज भारती संतराज्य प्रचार करितात ॥
संत मेल्यावर असंत संतांचे पाया पडतात ॥ ५ ॥

# ४६. उगवला मंगलदिन

उगवला मंगल दिन जन्मा आली कविता ॥
संतासाठीच निर्मीली संपदा संतच रसिक श्रोता ॥ १ ॥

भारती पडता काळ धर्माने चालणारा करितां ॥
निधर्मीयांची चलती अधर्मीयांची वहाते सरिता ॥ २ ॥

श्रीकृष्णाची छाया, विठ्ठलाची माया, संताची काया ॥
प्रतिभा प्रकाशात देहांत करी पंचारती देवराया ॥ ३ ॥

करिती काव काव कावळे नदी किनारी ध्यानस्थ बगळे ॥
श्रमिक संतासाठी करिते दुर्लक्ष सरकार कां ! न कळे ॥ ४ ॥

रहा ! स्वतः चे पायावर उभा पाठीशीं वनमाळी ॥
श्रमिकांचा हात हातांत वाजवा प्रेम भक्तीची टाळी ॥ ५ ॥

करा रामनामाचा सौदा संतांचे पेठेत देवाण घेवाण ॥
गरिबाकरिता हो गरिब नाहीसे होईल मी पण ॥ ६ ॥

संत भोजराज वदति जन हो ! ज्ञान अज्ञान फरक जाणा ॥
हातांत घेतां संत साहित्य घरा येतो पंढरीचा राणा ॥ ७ ॥

# ४७. शिष्टांची फुशारकी

शिष्टांची फुशारकी मुलगा कलेक्टर मिनिष्टर ॥
पुढाऱ्यांचा पोरगा वकील संतांची उडवितो टर ॥ १ ॥

श्रमिकांचे संतान श्रमानंतर भजती राम ॥
कष्टांचे फळ पोटासाठी मागती रोख दाम ॥ २ ॥

असंत सत्ता संपत्तीचे जोरावर गाठती स्वर्गद्वार ॥
श्रमिक संत कष्टालाच समजती रुक्मा देवीवर ॥ ३ ॥

असंतांचा उपदेश ! निधर्मी, अधर्मीयाकरिता ॥
संतांचे अमृतपान रहाते भारत सौख्याकरितां ॥ ४ ॥

संत भोजराज संतांचे पंगतीतच बसतात ॥
असंत, अभक्त स्वार्थीयांना शुद्रच मानतात ॥ ५ ॥



# ४८. संतांचे वैरी

प्रभूजी कोटीत सुंदर तव रुप मनोहर ॥
कुणी वदति मुरलीधर कुणांचा तूं गौरीहर ॥ १ ॥

आंबट, तुरट, गोड फळ चाखतां बरोबर ॥
देहांत रक्तच बनते प्रभूने फुंकर घातल्यावर ॥ २ ॥

देवा! तव भक्तीने बनतो वाल्याचा वाल्मीक ॥
शेटजी भक्तीने भटजी श्रीमंत जीवन जगती मौलीक ॥ ३ ॥

जगी तूंच करुणेचा सागर सौख्याचा आगर ॥
तनमनाची होता शुद्धी मनुजा येतो जागर ॥ ४ ॥

संत भोजराज वदति देव भक्तांचा रहातो कैवारी ॥
निधर्मी ठरतो कलाल अधर्मी दलाल वदा संतांचे वैरी ॥५॥

# ४९. ब्राम्हण जातीत जन्मला

तो योगानेच ब्राम्हण जातीत जन्मला ॥
देव म्हणजे काय अर्थ नच कळला ॥
विठ्ठल मंदिरात हक्क म्हणून शिरला ॥
दर्शन घडविता अंधांचा बडवा बनला ॥ १ ॥

सिंहाचा वाटा म्हणून राजकारणांत शीरला ॥
स्वर्गाची वाट धरुनच मंत्री बनला ॥
देशभक्ती म्हणजे काय अर्थनच उरला ॥
वक्तव्य ठरता भक्ती उपदेशीच बनला ॥ २ ॥

देवाने दिले सुंदर रुप गोड गळा सूर ॥
भारतीय भटजींचा आशिर्वाद गायक महशूर ॥
शेटजीचें वर्तमान पत्रांत प्रसिद्धीचा पूर ॥
गंधर्व गोहर बनता सूर संता समजती असूर ॥ ३ ॥

संत भोजराज वदति हा प्रचार शेटजी राज्याचा ॥
भटजींचा प्रयोग श्रमिकांना गुलाम करण्याचा ॥
संतांची करिती दिशाभूल स्वार्थीय हेका ॥
सांपळयांत शब्दांचा चणामका बनता काका बोका ॥ ४ ॥

×—×—×

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२००७६

# ५०. ज्ञान म्हणजे काय ?

ज्ञान म्हणजे काय एकाने बोलावे दुसऱ्याने ऐकावे ॥
घरचे गंगेचे पाणी भटजी ओंजळीने प्यावे ॥ १ ॥

दान म्हणजे काय साखर, तूप, रवा भाजावे ॥
संताचे घरचा प्रसाद असंतांचे हस्ते वाटावे ॥ २ ॥

शासन म्हणजे काय गाईवरील गोमाशा समजावे ॥
पंतप्रधान बनता कृष्ण शेटजींनी फेर धरुन नाचावे ॥ ३ ॥

राज्यांत पूज्य तो शिक्षणमंत्री भारतांत पुढारी पूज्य ठरावे ॥
ब्राम्हणच विध्वांन ठरतां संतांनी हात जोडावे ॥ ४ ॥

संत भोजराज फोडिती टाहो ज्ञान अज्ञान फरक ओळखा ॥
शेटजी भटजी अगाध ज्ञानाचा युक्तीने काढा विळखा ॥ ५ ॥

# ५१. विठोबा बंदिस्त केला !

चल ग सईऽ चल ग सईऽ जाऊं विठोबा दर्शनाला ॥
राई रुकमाईचा पती राही एकला पंढरीला ॥ १ ॥

वेद, स्मृती, श्रुती गीतेचा आवाज आज बंद पडला ॥
बंदीतून पळाला देव पत्ता संतांनाच कळविला ॥ २ ॥

वारा पावसाचा धनी कोटी टन धान्य पाठीला ॥
चमचाभर प्रसादासाठी तिष्टतो संत द्वाराला ॥ ३ ॥

श्रीमंत सावकारांचे मठ मंदीर देवच मुलखा वेगळा ॥
हा भक्तांचा रहातो सखा संसारी हातभार लाविला ॥ ४ ॥

संत भोजराजांनी देव हृदअीच बैसविला ॥
प्रेम भक्तीचे जोरांवर विठोबा बंदिस्त केला . ५ ॥



# ५२. त्रिवेणी संगम

सात्विक राजस तामस मनोयोग आहे ॥
अनासक्त आसक्त विषयासक्त देहभोग आहे ॥ १ ॥

शांती भ्रांती भ्रमंती पायरी आहे ॥
मुक्ती युक्ती शक्ती शायरी आहें ॥ २ ॥

वाद विवाद वितंडवाद गढी आहे ॥
पूजा अर्चा चर्चा मढी आहे ॥ ३ ॥

धर्म निधर्म अधर्म मानाचे पान आहे ॥
सुकर्म कर्तव्यकर्म दुष्कर्म जीवनाचे मर्म आहे ॥ ४ ॥

संत असंत नापसंत अंजन आहे ॥
मंडन खंडन मुंडन रंजन आहे ॥ ५ ॥

अचूक नजरचूक चूक परिक्षा आहे ॥
साजूक नाजूक मासूक रिक्षा आहे ॥ ६ ॥

संत भोजराजांचा आचार सुविचार आहे ॥
राजस तामस विचार कुविचार आहे ॥ ७ ॥



# ५३. आम्ही शस्त्रांचे व्यापारी

आम्ही शस्त्रांचे व्यापारी म्हणवीतो श्रमिक संत कैवारी ॥
असंताशी पुकारली लढाई जवळ बंदूका तोफा भारी ॥ १ ॥

शब्दांचाच कारखाना कथा, कांदबरी बाम दारुगोळा ॥
नाहीं सरकारचे परमीटची जरुरत आम्ही आहोत मराठमोळा ॥२॥

रात्रंदिन पोटासाठी राबतो फावल्यावेळी अभंग निर्मीतो ॥
कुणी निंदो वा वंदो ! खेद खंत बाळगीत नसतो ॥३॥

नच दुनियेला आमुची पर्वा आम्ही पण बेपर्वा ॥
कोण दुष्टचोर श्रीमंत थोर आमुचा विठ्ठल माधव बरवा ॥ ४ ॥

संत भोजराजांना मीळाली शांती अभंग निर्मीतीने ॥
देवाचेच गीत गातात लिखाण जनजागृति हेतूने ॥ ५ ॥

# ५४. संत्संगती

आम्ही जे बोलतो ते तुम्ही आदराने ऐकाल काय ? ॥
तुम्ही राजस तामस तुमचा आमुचा संबंध काय ? ॥ १ ॥

आम्ही कांही लिहीतो ते भक्ती भावाने वाचाल काय ॥
मनोरंजन करमणूक हॅाऽ हाऽ हीऽ हीऽ शी संबंध काय ॥ २ ॥

आम्ही गरिबी हटवितो गरिबांना हटवू द्याल काय ॥
गरिबी धर्म कष्ट कर्तव्यकर्म अधर्मीवर विश्वास नाय ॥ ३ ॥

आम्ही आहोत पुढारी भरवसा ठेवाल काय ॥
निधर्म सत्ता अधर्म मत्ता आम्हां धर्म तरणोपाय ॥ ४ ॥

संत भोजराज वदति संताचेच लिखाण ठेवा संगती ॥ ५ ॥
संत म्हणजे ज्ञानज्योती संत संग समजा सत्संगती ॥ ५ ॥



# ५५. निघाला विठोबा सार

चाळीस वर्षाचा संसार  निघाला विठोबा सार ॥
आतां नको नको भार देवा !  तुजविण जग हे असार ॥ १ ॥

ना कुणाचं देणं कुणाकडे घेणं लाभलं तुझंच लेण ॥
गळतां गळ्यांतील लोढणं विठ्ठलच बनला देणघेणं ॥ २ ॥

प्रेमाचीच मागता भीक व्यवहारी वदती व्यवहार शीक ॥
वाघाचा बनता वाघ्या म्हणे शाळेत ईज्जत वीक ॥ ३ ॥

शेटजी राज्यांत संत गुलाम अज्ञानींना रामराम ॥
संतांना मागे हटविणे हेच शिष्टांना आहे काम ॥ ४ ॥

संत भोजराज वदति भारती संत सती ठरतात ॥
चितेवर चढतां देह निधर्मी धाय धाय रडतात ॥ ५ ॥



# ५६. करायला गेलो गणपती

करायला गेलो गणपती चुकून मारोती बनला ॥
हंसतात काय षंढांनो ! कलाकारांचा कलावंत ठरला ॥ १ ॥

संत निघाला यात्रेला रस्त्यांत श्रीकृष्ण भेटला ॥
दूधांत पडली साखर केशर ! घोटाळा काय झाला ॥ २ ॥

संताने अमृतपान केले चुकून अपान वायु सुटला ॥
ओरडतात काय शिष्टांनो ! देहाचा धर्म देहाने पाळला ॥ ३ ॥

संतांचा आदर्श संसार ! नच फाटका नेटकाच केला ॥
सरकारचे नजरेत नच भरला संतांचा देवच बनला ॥ ४ ॥

संत भोजराज वदति असंत अराजकांचे नादी लागू नका ॥
धर्म निधर्म एक नाही हेच ओरडत होता कबीर तुका ॥ ५ ॥



# ५७. देवा ! शपथेवर सांगतो

देवा ! शपथेवर सांगतो संतांना असंतांचा नच हेवा ॥
वाघ सिंहाची हिंसक जात जगी संतापुढे त्यांचा काय केवा ॥ १ ॥

देवा ! सत्य तेच बोलतो भक्तांना अभक्तांचा नच हेवा ॥
सरकारचा आशिर्वाद श्रमिकांना शिव्याशाप हाच पुरावा ॥ २ ॥

देवा ! अनुभवाने जाहीर करतो साधूंना राजसांचा नच हेवा ॥
नफा तोट्याचे व्यापारी मरणांती भोवला कावा दावा ॥ ३ ॥

देवा ! भारती लेखीच देतो आम्हां तामसांचा नच हेवा ॥
तामस बोल सोमरस संत गोरस तूंच प्रत्यक्ष पुरावा ॥ ४ ॥

संत भोजराजांना संत असंत फरक नौकरीत कळला ॥
श्रमिक, सामान्य, गरिबासाठी संत राज्य प्रचार केला ॥ ५ ॥

# ५८. देवा ! जेथे जावे तेथे

देवा ! जेथे जावे तेथे तूंच रहातो सांगाती ॥
तुझीच कृपा छाया भारती संत हेच गीत गाती ॥१॥

लहानपणीच घडतां प्रभूदर्शन मम क्षेत्र उजळले ॥
संतच मायबाप गुरुजन पाय पंढरीकडे वळले ॥ २ ॥

कष्ट त्याग प्रेम भक्तीतून केला सुखाचा संसार ॥
संकट येता भारतांवर तूंच उचलला साराभार ॥ ३ ॥

देवा ! अगाध तुझी लीला संतांचा भार वाहिला ॥
असंत अभक्तावर पण कृपा फळा पासून अलग राहीला ॥४॥

संत भोजराज वदति देवाबद्दल शंका घेऊ नका ॥
देव कष्ट त्याग प्रेम भक्ती दुर्बिनिने पहाणे शिका ॥५॥



# ५९. देवा ! तुजवरच ठेवीती नजर

देवा ! तुजवरच ठेवीती नजर लहानसान थोर ॥
तूं द्यावे धन धान्य संपदा संसारात नसावा घोर ॥ १ ॥

देवा ! संसारांत होता भले सर्वच वदति मी केले ॥
गर्वाचे बनता वाद्यसुरांनी शक्ती बुद्धीचे गीत गाईले ॥ २ ॥

धंद्यात खोट निवडणूकीत पदरमोड येता अपयश ॥
तुजवरच फोडती खापर हंडी संतांना देती दोष ॥ ३ ॥

श्रमिक सामन्यांचे कल्याणाचा पुढारी घेती ठेका ॥
देव धर्माचा संतांचा पडावा विसर ह्याच राही हेका ॥ ४ ॥

संत भोजराज वदति संतांनो हातात घ्या झरणी ॥
देवाचा गा महिमा संत सरितेने भीजवा धरणी ॥ ५ ॥



# ६०. देव देवच करावे

आता आयुष्यभर आम्ही देव देवच करावे ॥
तुम्हीच सागा संतांनो ! देवाशिवाय काय बोलावे । १ ॥

बिभूतिमुळे होता भले कां विभूतिचेच गीत गावे ॥
पुढारी पेंढाऱ्यांची स्तुती हजारो टन कागद लिहावे ॥ २ ॥

निधर्मी अधर्मीचा लेंडीनाला घाणीने भरुन वहावे ॥
शेटजी भटजी एकजूट अहो रुपम् अहो ध्वनीम् म्हणावे ॥ ३ ॥

तुकारामानंतर भारती भटजी पोरं बनली संत ॥
गरिब जनतेला जे बनवितात ते सरकार पसंत ॥ ४ ॥

संत भोजराज वदति संतावर रहाते देवाची कृपा ॥
भारती राजे मेले तरी पुढाऱ्यांना पुकारावे बा ! नृपा । । ५ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २००४६ वि. का.
क्रमांक २९८० नों. दि. २-३-७९
REFBK-0020046
REFBK-0020046